
दाग: दिलीपकुमारची नायिका मधुबाला होती पण...

१९४२-४३च्या सुमारास युसूफ खान नामक एक तरुण पुण्याच्या मिलिट्री कँटोन्मेंटमध्ये दरमहा ३५ रुपये पगारावर मॅनेजरची नोकरी करत होता. ही नोकरी करतानाच मिलिट्री कँटोन्मेंटमध्ये सैनिकांसाठी त्याने कँटिन चालू केलं आणि त्याची कमाई एकदम ८००रुपयांच्या घरात गेली. पण कँटिनचं कॉंट्रॅक्ट एका वर्षाचं होतं. ते वाढवून घेईपर्यंत दुसरं महायुद्ध संपल्याने मिलिट्रीत सैनिकांची कपात सुरू झाली. कँटिनचं गिऱ्हाईकही कमी झालं आणि ते त्याला बंद करावं लागलं. त्याला प्रश्न पडला पुढे काय?

नोकरीच्या शोधात मुंबईला आलेला युसूफ वणवण भटकू लागला. बॉम्बे टॉकीजचे दिग्दर्शक अमिया चक्रवर्तीनी एकदा त्याला पाहिलं. *ज्वार भाटा* या बॉम्बे टॉकीजच्या नव्या चित्रपटासाठी त्यांना नवा चेहरा म्हणून युसूफ योग्य वाटला. बॉम्बे टॉकीजच्या संचालिका देविकाराणींशी त्यांनी त्याची भेट घडवून आणली. दरमहा ६२५ रु. पगारावर त्यांनी त्याला करारबद्ध केलं. त्याचं युसुफ खान हे नाव मात्र त्यांना खटकलं.

आज आमिर खान, सलमान खान, शाहरूख खान ही नावं चित्रपटात चालतात. तेव्हा देखील डब्ल्यू.एम.खान, अश्रफ खान, मजहर खान अशी नावं होतीच. त्यामुळे युसूफ खान चालायला काहीच हरकत नव्हती. पण देविकाराणीनी ते बदलायचं ठरवलं. त्यासाठी



दिलीपकुमार: कालचे आणि आजचे



जहाँगीर, वासुदेव व दिलीपकुमार ही तीन नावं पुढे आली. देविकाराणींना दिलीपकुमार हे नाव आवडलं. १९३६च्या *जीवन नैया*पासून १९४३च्या *किस्मत*पर्यंत अशोककुमारने बॉम्बे टॉकीजच्या चित्रपटात आपलं एक युग निर्माण केलं होतं आणि यामुळे कुमार या नावाचा एक वेगळाच प्रभाव बॉम्बे टॉकीजच्या चित्रपटात निर्माण झाला होता. युसूफ खानसाठी दिलीपकुमार हे नाव देविकाराणींनी यामुळेच निवडलं.



दागमध्ये मधुबाला ऐवजी निम्मी आली.



अमिया चक्रवर्ती तेव्हा बॉम्बे टॉकीजचे एक मान्यवर दिग्दर्शक होते. देविकाराणीचा शेवटची भूमिका असलेला बॉम्बे टॉकीजचा *हमारी बात* हा त्यांच्या दिग्दर्शनातला चौथा चित्रपट. त्यावेळी राज कपूर त्यांच्या हाताखाली सहाय्यक होते. *हमारी बात*नंतर ते बॉम्बे टॉकीजमधून बाहेर पडले. फ्री लान्सर म्हणून *मेरा सुहाग*, *गर्ल्स स्कूल*, *गौना*, *बादल* हे चित्रपट अन्य चित्रसंस्थासाठी दिग्दर्शित केले. या चित्रपटांनी दिग्दर्शक म्हणून चांगलं यश मिळवून दिलं तरी ते समाधानी नव्हते. त्यांना निर्माता बनायचं होतं. १९५२ला त्यांचं हे स्वप्न साकार झालं. मार्स ॲण्ड मुव्हीज ही स्वतःची चित्रसंस्था त्यांनी स्थापन केली. *दाग* हा त्यांचा पहिला चित्रपट. दिलीपकुमार तेव्हा हिंदीतला आघाडीचा अभिनेता बनला होता. *दाग*मधे तोच नायक असावा असं ठरवून चित्रपटाची योजना त्यांनी आखली खरी पण दिलीपकुमारला विचारायची हिंमत काही होईना. गगनाला भिडलेली त्यांची मार्केट प्राइस त्यांच्या आवाक्याबाहेरची होती. अनेकाजवळ त्यांनी तसं बोलून दाखवलं. ते दिलीपकुमारला कळलं तेव्हा तो स्वतःहून त्यांना भेटायला गेला आणि म्हणाला, 'आपल्या *दाग*मध्ये मला नायकाची भूमिका करायचीय.'

'मलादेखील नायक म्हणून तूच हवा आहेस. पण एक अडचण आहे.'

'कसली अडचण?'

'तुझी मार्केट प्राइस मला परवडणारी नाही.'

'त्याचा विचार करायचं तुम्हाला काहीच कारण नाही.'

'का?'

'मार्केट प्राइस इतरांसाठी. आपल्या लोकांसाठी नाही.' अशा रितीने अमिया चक्रवर्तींनी दिलेल्या किंमतीत दिलीपकुमारने चित्रपट स्वीकारला.

दिलीपकुमारच्या बाबतीत एक आक्षेप नेहमी घेतला जातो. तो प्रत्येक चित्रपटात हस्तक्षेप करत असे. *दाग*चे लेखक राजेंद्र सिंग बेदी यांनी एका लेखात याची पुष्टी दिलीय. त्यांनी लिहिलंय, '*दाग*ची कथा ऐकून अमिया चक्रवर्ती आनंदातिशयाने नाचायला लागले. त्यांनी शूटिंगदेखील सुरू केलं. दिलीपकुमार *दाग*चा नायक होता. मी लिहिलेल्या संवादांत बरेच हेरफेर करून त्याने ते नव्याने लिहीले. अमिया चक्रवर्तीदेखील त्याला काही बोलू शकले नाहीत. कारण त्याला कोणीही काही बोलू शकणार नाही अशा उंचीला तो पोहोचला होता. मी लेखक म्हणून बाजूला राहिलो आणि *दाग*च्या यशाचं सारं श्रेय एकटा दिलीपकुमार घेऊन गेला. तो या चित्रपटाचा केवळ नायकच नव्हता, संवाद लेखकदेखील होता.'

योगायोग पहा, अमिया चक्रवर्तींच्या *ज्वार भाटा*तून पदार्पण करणाऱ्या दिलीपकुमारला पहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला तोदेखील अमिया चक्रवर्तींच्या *दाग*साठीच. त्यानंतर *आझाद*, *देवदास*, *नया दौर*, *कोहिनूर*, *लीडर*, *राम और श्याम*, आणि *शक्ती* या चित्रपटांसाठी असा एकूण आठ वेळा त्याला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला.

*दाग*मध्ये दिलीपकुमारची नायिका होती निम्मी. पण अगोदर दिलीपकुमारबरोबर मधुबालाला घेऊन अमिया चक्रवर्तींनी या चित्रपटाची घोषणा केली होती. दिलीपकुमारप्रमाणेच मधुबालादेखील अमिया चक्रवर्तींचीच फाईन्ड. १९४२ साली अमियाजींनी बॉम्बे टॉकीजसाठी *बसंत*चं दिग्दर्शन केलं होतं. मधुबाला या चित्रपटात बालतारका होती त्यानंतर १९५२च्या त्यांच्याच *बादल*मध्ये नायिका. *बादल*चं चित्रण चालू असतानाच *दाग*मध्ये दिलीपकुमारबरोबर तिला घ्यायचं असं त्यांनी ठरवलं होतं. तीदेखील या चित्रपटात भूमिका करायला राजी झाली होती. तेव्हा दिलीपकुमार-मधुबालाबद्दलचे किस्से तिचे वडील अताऊल्ला खान यांच्या कानावर गेले. त्यांना ते पसंत नव्हतं. त्यामुळे *दाग* स्वीकारूनही मधुबालाला तो सोडावा लागला. तिच्या जागी निम्मी नायिका बनली. त्यातली दिलीपकुमारची दारुड्या नायकाची भूमिका अशी काही लोकप्रिय ठरली की हिंदी चित्रपटात दारुड्या नायकांची एक लाटच आली. या लाटेत राज कपूरचा *मैं नशे में हूं*, राजेंद्रकुमारचा *गुंज उठी शहनाई* , अशोककुमारचा *बेजुबान*, देव आनंदचा *शराबी* असे बरेच चित्रपट आले.

*दाग*मधले अन्य कलाकार होते उषा किरण, ललिता पवार, चंद्रशेखर, जवाहर कौल, लीला मिश्रा, कृष्णकांत. यातला जवाहर कौल नंतर मिथुन चक्रवर्तीचा सेक्रेटरी बनला. *दाग*मध्ये उषाकिरण सहनायिका होती. तिला पहिला ब्रेक अमियाजींच्याच *गौना*मध्ये मिळाला होता तरी *दाग*मधल्या भूमिकेने हिंदीत खरी ओळख मिळवून दिली. तन्वी आझमी तिची कन्या.

शंकर-जयकिशन *दाग*चे संगीतकार होते. त्यांनी या चित्रपटात महाराष्ट्रातील लावणी ही लोककला सर्वात प्रथम हिंदीत आणली. तलतने त्यातील 'ऐ मेरे दिल कहीं और चल...' हे हिट गाणं दिलीपकुमारसाठी दोनदा गायलं होतं. लताबाईंच्या आवाजातदेखील हे गाणं धीम्या लयीत होतं. 'मौत आ गई काहे को देर लगाई...', 'लागे, जब से नैन लागे...', 'प्रीत यह कैसी बोल री दुनिया...' ही या चित्रपटातील आणखी तीन गाणी लताबाईंच्या आवाजात होती. या गाण्यांपैकी 'देखो आया ये कैसा जमाना...', 'ऐ मेरे दिल कहीं और चल...', 'प्रीत यह कैसी बोल री दुनिया...', 'लागे, जब से नैन लागे...' व 'बुझ गए गम की हवा मे...' ही गाणी शैलेंद्रनी लिहिली होती. अन्य गाणी हसरतनी.

□ इसाक मुजावर